साप्ताहिक कमलाभवानी
संदेश
वर्ष 34 वे
करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...
संस्थापक संपादक
डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०
www.saptahiksandesh.com
नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.१ | पाने-१२ | दि.५/१/२०२४ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ४ रू.

दुःख सारी विसरून जावू,
सुख देवाच्या चरणी वाहू
स्वप्ने उरलेली.. नव्या या वर्षी,
नव्या नजरेने नव्याने पाहू
नववर्षाच्या
हार्दिक शुभेच्छा!

॥ श्री कोटलिंग प्रसन्न ॥
स्थलांतर.. स्थलांतर..
शिवम
मजबुती आणि विश्वास एकाच ठिकाणी..!
स्टिल ॲन्ड सिमेंट एजन्सी
टी.एम.टी.बार चे अधिकृत विक्रेते
खडी, क्रॅशसॅण्ड योग्य दरात मिळेल
प्रोप्रा : अमोल बबन ढवळे
(9850125561, 9423339966)
पत्ता : नगर-सोलापूर बायपास रोड, निलज चौक, संत निरंकारी मंडळ, शेजारी, करमाळा.
आयकॉन स्टीलचे अधिकृत विक्रेते

प्रतिकुल परिस्थितीतही पतसंस्थांची वाटचाल नेटाने सुरू

ग्रामीण बिगरशेती २५ तर नागरी सहकारी १८ संस्था रेकॉर्डवर

करमाळा : बारलोणीच्या पतसंस्थांनी तालुक्यातील ठेवीदारांना जवळपास ४० कोटी रूपयाची फसवणुक केली. त्यानंतर बारलोणीच्या पतसंस्था तर बंद पडल्याच पण तालुक्यातील अनेक पतसंस्थाही बंद पडल्या. असे असूनही काही पतसंस्थांनी प्रतिकुल परिस्थितीतही नेटाने वाटचाल सुरू केली आहे. सध्याच्या स्थितीला २५ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था तर १८ नागरी सहकारी पतसंस्था कार्यरत आहेत.

नागरी सहकारी पतसंस्थांची २० संख्या असताना २०२२ ते २०२३ या कालावधीत दोन पतसंस्था बंद पडल्या आहेत. त्यामुळे नागरी सहकारी पतसंस्था १८ कार्यरत आहेत. यामध्ये आनंद ग्रामीण जेऊर, लोकनेते नारायण आबा पाटील (जेऊर), स्वामी विवेकानंद पतसंस्था (जेऊर), कै.सुभाष पाटील पतसंस्था (साडे), केडगाव ग्रा.बि.पतसंस्था (केडगाव), शामलताई बागल पतसंस्था श्रीदेवीचामाळ, दिगंबरराव बागल पतसंस्था (करमाळा) या पतसंस्थेचे व्यवहार उल्लेखनीय आहे. याबरोबरच दिगंबरराव बागल (मांगी), गणेश ग्रामीण (घोटी), गोविंदबापू पाटील (भाळवणी), हनुमंतराव गायकवाड (देवळाली), प्रतापसिंह शिंदे (कंदर), ज्योर्तिलिंग ग्रामीण (कंदर), कल्याणराव पवार (पोफळज), लोकविकास (वांगी), रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील (कुंभेज), गिरिजा ग्रामीण (कंदर), दत्त ग्रामीण (वांगी नं.२), कीर्तेश्वर ग्रामीण (केत्तूर), आदर्श लोकविकास (कोर्टी) आदी पतसंस्था प्रतिकुल परिस्थितीतूनही मार्ग काढत आहेत. याशिवाय करमाळा येथील नागरी पतसंस्थामध्ये विलासराव घुमरे पतसंस्था, जय महाराष्ट्र पतसंस्था, सुभाष आण्णा सावंत पतसंस्था, मॉसाहेब पतसंस्था, मेडिकोज पतसंस्था, पद्मावती देवी महिला पतसंस्था, श्रीराम नागरी पतसंस्था, संत गोरोबोकाका कुंभार पतसंस्था, स्व.दिगंबररावजी बागल पतसंस्था आदी पतसंस्था कार्यरत आहेत. यापूर्वी व्यवहार परिपूर्ण नसल्याने अंजनडोह येथील अनंतराव शेळके, विहाळ येथील ग्रामसुधार, घोटी येथील उत्कर्ष, नेरले येथील शिवाजीराव भोसले, चिखलठाण येथील ओम साईनाथ, घोटी येथील जीवनदायी, सांगवी येथील कोटलिंग, जेऊर येथील पांडूरंग, वाशिंबे येथील शंभुराजे, केम येथील विठ्ठल, करमाळा येथील सहाराजीवन, शंभुराजे नागरी, श्रीराम नागरी, विघ्नहर्ता नागरी, जय-विजय नागरी, भोसे येथील दिगंबरराव बागल, वरकुटे येथील सद्‌गुरू माऊली तसेच सद्‌गुरू शिवलाल स्वामी या पतसंस्था सहकार कार्यालयाने बंद केल्या आहेत. सध्याच्या ग्रामीण बिगरशेती व नागरी सहकारी पतसंस्था मधील जवळपास १५ पतसंस्था मोडकळीस आल्या आहेत.

> पतसंस्थांनी सभासदाची पत पाहून तसेच कर्ज कोणत्या गोष्टीसाठी घेतले जात आहे; याची योग्य माहिती घेऊन कर्ज दिले पाहिजे. चुकीच्या व्यक्तींना कर्ज देऊन संस्थांचे अधोगती होते हे संस्थाचालकांनी लक्षात घेतले पाहिजे. जर पत असूनही सभासद कर्ज देत नसतीलतर सहकार कायद्यातील कलम १०१ प्रमाणे प्रस्ताव दाखल करण्याची तयारी ठेवली पाहिजे. नवीन पतसंस्था सुध्दा नोंदणी करता येतात.
>
> **...उमेश बेंडारी**
> (प्र.सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था करमाळा)

मे. आनंदी ज्वेलर्स
मेन रोड,करमाळा.Ph.(02182) 22 22 09 ✆9420915099
श्रृंगार पर चढेगा असली रंग
इस मकर संक्रांति गहनों के संग।
AJK
abhijeet-9423537323

कामाच्या अगोदर नियोजन करा अर्धे यश तिथेच मिळालेले असते...!

संपादकीय..................................!

साखर कारखानदार आणि शेतकरी

यावर्षी पावसाने हात आखडता घेतला आणि सर्वांनाच विचारात टाकले. यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. विशेष म्हणजे ऊस उत्पादक आणि साखर कारखानदार दोघेही चिंतेत आहेत. आदिनाथ व मकाईने यावर्षी ब्रेक घेतला. भैरवनाथ व कमलाई यांचा यावर्षीचा हंगाम कसा-बसा अर्धवट होईल; पण पुढील वर्षीचा हंगाम कसा पूर्ण करायचा ? या विवंचनेत सर्वच साखर कारखानदार आहेत. या दोन हंगामातील कर्मचाऱ्यांचे पगार, गुंतवलेल्या भांडवलाचे व्याज, ऊस उत्पादकांना द्यावयाचा भाव व वाहनधारकांना दिलेली उचल याचे नेमके काय करायचे ? हा एक प्रश्न अणि कारखान्याचा वाढणारा तोटा कसा भरून काढायचा ? हा दुसरा प्रश्न. या दोन प्रश्नांचा गुंता कसा सोडवायचा..? हे कारखानदाराला आव्हान आहे.

परवा एका वक्त्याने आपल्या भाषणात सुंदर वाक्य सांगितले. तो म्हणाला.."निसर्ग हा आपल्या जागेवर असतो. तो आपले काम आपल्या पध्दतीने करत राहणार. आपण सावध नसल्याने निसर्गाचा फटका आपल्याला बसतो." वास्तविक पाहता दर दोन-चार वर्षाला दुष्काळाचा फटका बसतो, हे माहित असूनही शेतकरी आपल्या शेतीचे नियोजन करत नाही. पीकाचे धोरण आखत नाही आणि विक्रीचा अंदाजही घेत नाही. यामुळे कष्ट करूनही शेतकरी फायद्याऐवजी तोट्यात जात आहेत. वरचेवर खत, पाणी, वीज यांच्या किंमती वाढत आहेत. तर दुसऱ्या बाजूला शेती उत्पादन कमी व मालाचे भावही कमी होत आहेत. त्यामुळे अधिक तोटा होत आहे. ज्याप्रमाणे शेतकऱ्याचे नियोजन होत नाही त्याप्रमाणे साखर कारखानदारांचे नियोजनही होत नसल्याचे दिसत आहे. आपल्या परिसरात चांगल्या काळात ऊस मिळणार पण दुष्काळी स्थितीत ऊस पुरेसा मिळणार नाही , हे लक्षात घेऊन कारखानदारांनी उपपदार्थ निर्मितीवर लक्ष केंद्रीत करण्याची गरज आहे. आपल्याकडे को-जनरेशन (वीज उत्पादन) याबाबीवरच भर दिला जातो. पण अन्य पर्याय स्पिरीट, इथेनॉईल, बगॅसपासून विक्रीचे इंधन निर्मिती, चुयटीपासून कागद निर्मिती, मळी पासून खत निर्मिती असे अनेक निर्मितीचे उद्योग आहेत पण त्याकडे आपण लक्ष देत नाही. करमाळा तालुका हा नगर, पुणे, उस्मानाबाद, बीड व सोलापूर या पाच जिल्ह्याच्या सरहद्दीवर आहे. या तालुक्यात उजनी आणि कोळगाव प्रकल्पाचे पाणी मिळत आहे. याबरोबरच पाऊसकाळ चांगला असेलतर छोटे तलाव आणि शेतकऱ्यांच्या विहिरींना पाणी राहते आणि मग शेतकरी ऊसाची लागवड करतो. चांगल्या कालावधीत सुमारे ४० लाख मेट्रीक टन ऊसाची उपलब्धता सहज होते. तालुक्यात सुरूवातीला आदिनाथ कारखाना त्यानंतर गरज म्हणून मकाई कारखाना सुरू झाला. दोन कारखान्याच्या कार्यक्षमतेपेक्षा जास्त ऊस दिसत असल्याने विहाळ येथे भैरवनाथ शुगरची उभारणी झाली, नंतर कमलाईची उभारणी झाली. चांगल्या स्थितीत या चारही कारखान्याच्या गाळपाला धोका नाही. परंतू दुष्काळीस्थिती असेलतर अडचण होते. यावर्षी तर अडचण आलीच पण पुढील वर्षी चारही कारखान्याच्या गाळपावर मोठा विपरीत परिणाम होणार आहे.

यावर्षी कोळगाव प्रकल्पाचे पाणी शेतीला उन्हाळ्यात उपलब्ध होत नाही, तीच परिस्थिती उजनीबाबतही होत आहे. दहीगावला पाणी मिळण्याची शक्यता नाही. पिण्याच्या नावाखाली पाणी राखीव राहणार, वीज कपात केली जाणार, त्यामुळे ऊसाला पाणी मिळणे कठीण जाणार आहे. पर्यायाने ऊसाचे उत्पादन कमी होणार; हे सांगण्यासाठी भविष्यकाराची गरज नाही. दुसरी गोष्ट अशी आहे, की ऊसाला पर्याय म्हणून तालुक्यातील शेतकरी केळी पीकाकडे वळला आहे. त्यामुळे उसाचे ३५ टक्के उत्पादन कमी होत आहे. दुसऱ्या बाजूला या तालुक्यातील ऊसाकडे नजर ठेवून उभा राहिलेले अंबलिका राशिन, साईकृपा हिरडगाव, श्रीराम हाळगाव, इंद्रेश्वर बार्शी, विठ्ठलराव शिंदे माढा, विठ्ठल शुगर म्हैसगाव हे कारखाने आहेत. स्थानिक कारखान्याला जेवढा ऊस जातो तेवढाच ऊस हे कारखाने प्रतिवर्षी घेऊन जातात. यावर्षीच्या दुष्काळी स्थितीत या सर्वच कारखान्याचे कसे होणार ? हा महत्वाचा प्रश्न आहे. सर्व कारखानदारांनी निसर्गाचे रूप पाहून कारखाने उभा केले पण कारखाना उभारताना दुष्काळ पडलातर काय ? याचे कोणीही नियोजन केल्याचे दिसत नाही.

कोल्हापूर भागातील काही कारखान्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात स्वत:चा आणि पॅकेजमधील सभासदांचा ऊस नियोजितरितीने वाढवलेला असतो. दुष्काळ असो नाहीतर नसो त्यांचा ऊस नक्की असतो. आडसाली, पुर्व हंगामी, सुरू, खोडवा याचा ताळमेळ असतो. मुळातच कारखाना प्रतिनिधी ऊसाची लागवड करताना शेतकऱ्याच्या संपर्कात राहतात. ऊस लागवड करतानाच त्यांना ऊस तोडण्याची तारीख सांगितली जाते. तेथे ऊसतोड कार्यक्रमात कोणीही ढवळा ढवळ करत नाही. आगोदर सभासदांचा ऊस गाळप करणे व सर्व ऊसाचे गाळप झाल्यानंतर अन्य कोणाचा असेल त्याचा ऊस गाळप केला जातो. तोही ऊस साखर उतारा देणारा असेलतरच घेतला जातो. कारखान्यात साखर उतारा चांगला कसा मिळेल; याकडे या कारखानदारांचे लक्ष असते. जादा साखर उतारा मिळाला तर कारखाना खर्च, नफा भागून सभासदांना चांगला भाव मिळतो. आपल्याकडे सरासरी १० ते ११ साखर उतारा असतो. त्यांच्याकडे १३ ते १३.५ सरासरी साखर उतारा असतो. एका टनाला त्यांना ३० ते ३५ किलो साखर जास्त मिळते. त्यामुळे सभासदाला भाव द्यायला काही अडचण पडत नाही.

याशिवाय याच कारखानदारीवर पर्यायी व्यवसाय राबवले जातात. असावनी प्रकल्प, वीज प्रकल्प, कागद प्रकल्प, सोबत दुधाचे प्लॅन्ट, तांत्रीक शिक्षण संस्था, पाणी वाटप संस्था, शेतीपुरक उद्योग अगदी खत व पशुखाद्य निर्मितीचे उद्योग आहेत. त्यामुळे कामगारांना सतत काम मिळते. मालाला ग्राहक मिळतो व ग्राहकाला स्वस्त दारात माल मिळतो. दुष्काळ असो नाहीतर सुकाळ असो, तेथे पाण्याची चैन केली जात नाही. मोठ मोठे तलाव व ठिबक शेती हे दोन पर्याय राबवले जातात. वर्ष-दोन वर्षेपाऊस पडला नाहीतरी शेतकरी घाबरत नाही व कारखानदारही चिंता करत नाहीत. तेथे नियोजन असते.

पण आपल्याकडे फक्त साखर काढणे हा एकमेव उद्योग आहे. साखर कारखान्यात ऊस विकास व ऊस पुरवठा हे दोन विभाग असतात. त्यातील ऊस विकास हा विभाग क्रियाशुन्य राहतो. दोन्ही विभाग फक्त ऊस पुरवठ्याचेच काम करतात. ऊस असेलतर ठिक. दुष्काळ पडला की ऊसाअभावी कारखाने बंद. पाऊस पडला नाहीतर शेती बंद. शेतकऱ्यांनी कधी नियोजन केले आहे काय..? पाऊस जरी पडला नाहीतरी आपला दोन एकर ऊस ठिबकवर जगवू शकतो. अथवा दुसरे पर्याय देवून म्हणजे शेततळी बांधून अथवा बाहेरून पाणी आणून जगवू शकतो. असे नियोजन नाही. आपण एकदम आठ-दहा एकर ऊस लावतो आणि पाऊस नसला की सर्वच ऊस जाळून जातो. वास्तविक पाहता प्रत्येक बाबीचे नियोजन केले पाहिजे. ऊस नसेलतर दुसरे कोणते पीक घेता येईल का..? याचा विचार झाला पाहिजे. इस्त्राईलसारख्या देशात आपल्या दुष्काळापेक्षा कमी पाऊस पडूनही ते जास्तीत जास्त उत्पादन घेतात, ते कसे ..? याचा कधीतरी आपल्या शेतकऱ्यांनी विचार करायला हवा.

साखर कारखानदार आपल्या जवळचे भांडवल गुंतवून कारखाना उभा करतात, पण तो परावलंबी पध्दतीने चालवतात. जेंव्हा कोणताही उद्योग दुसऱ्यावर अवलंबून असतो, तेंव्हा त्या उद्योगाचे काहीच खरे नसते. त्यामुळे तर पूर्वी शेती महामंडळ उभे केले. तेथे शेकडो एकर शेती संपादीत केली होती व त्यावर ऊस लावून तेथे साखर कारखाने उभारले होते. नगर जिल्ह्यातील बेलवंडी व बेलापूर हे दोन कारखाने त्याची उदाहरणे आहेत.आता शेती महामंडळ निघाले मोडीत व त्यांचे कारखानेही विकले कवडी मोलाने. असो.. यापुढे तरी सर्वच व्यावसायिकांनी विशेषत: शेतकऱ्यांनीही शेतीचे योग्य नियोजन केले पाहिजे. अन्यथा यापुढे तीन वर्षेचांगले जातील, एक वर्ष खराब जाईल व सर्व मेहनत त्यात मातीत जाईल हे विसरून चालणार नाही.

मकर संक्रांती च्या हार्दिक शुभेच्छा
WASHIMBEKAR
Saraf & Son's
वाशिंबेकर
सराफ अँन्ड सन्स
सुनिल तुकाराम वाशिंबेकर ९४२१०६२८६२
शेखर सुनिल वाशिंबेकर ८४५९००३४२८
सुभाष चौक, डॉ. पुंडे हॉस्पीटल शेजारी, राशिन पेठ,करमाळा, जि.सोलापूर - ४१३२०३
कॉम्प्युटर ऑपरेटर आकाऊंटींग साठी मुलगा किंवा मुलगी पाहिजे.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत अक्षय काळे राज्यात प्रथम

करमाळा(सं.प्र.) : महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत ऑक्टोबर २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या महाराष्ट्र गट ब मुख्य परीक्षा २०२२ चा निकाल २१ डिसेंबर रोजी जाहीर झाला. यामध्ये करमाळा शिवसेना उपशहरप्रमुख राजाभाऊ काळे यांचा पुतण्या अक्षय ईश्वर काळे (ह.रा.सूर्डी, ता.बार्शी) या तरूणाने यशाला गवसणी घातली आहे. त्याची राज्य करनिरीक्षक पदी निवड झाली आहे. तसेच सहाय्यक कक्ष प्रमुख मंत्रालय यात तो राज्यात पहिला आला आहे. अक्षय काळे यांच्या यशामुळे सुर्डी येथे व करमाळ्यात जल्लोष साजरा करण्यात आला. मित्र परिवाराकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अक्षय काळे यांचे वडील ईश्वर काळे हे महावितरण मध्ये प्रिन्सिपल ऑपरेटर पदावर माढा येथे कार्यरत आहेत. अक्षय याचे पहिली ते दहावीचे शिक्षण महात्मा गांधी विद्यालय करमाळा व दिलीपराव सोपल विद्यालय बार्शी, वालचंद कॉलेज ऑफ आर्ट ॲन्ड सायन्स सोलापूर येथे झाले आहे. त्यांनी मेकॅनिकल इंजिनिअरींगची पदवी घेतली आहे. परीक्षेचा अभ्यास करण्याची प्रेरणा त्यांचे आजोबा कै.मच्छिंद्र काळे यांच्याकडून घेतली. त्यांचे आजोबा ग्रामसेवक ते विस्तार अधिकारी म्हणून कार्यरत होते. अक्षय यांचे लहान बंधू अजय काळे आयआयटी कंपनीत सॉफ्टवेअर डेव्हलपर या पदावर कार्यरत आहे.

राज्य कर निरीक्षक पदी निवड झाल्याबद्दल करमाळा शिवसेना उपशहरप्रमुख राजाभाऊ काळे यांनी करमाळा येथे त्यांचे समर्थक व कार्यकर्ते यांच्यासह परिवारा तर्फे पेढे वाटून आनंद साजरा केला होता.

श्रीराम मंदिराच्या जीर्णोध्दाराचे काम पूर्णत्वाकडे - २२ जानेवारीला मुर्तीची प्रतिष्ठापना

करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरातील वेताळपेठ येथील श्रीराम मंदिराच्या जीर्णोध्दाराचे काम पूर्णत्वासकडे आले असून, २२ जानेवारीला श्रीराम च्या मुर्तीची प्रतिष्ठापना दुपारी बारा वाजता होणार आहे. श्रीराम मंदिराचे जीर्णोध्दाराचे काम गेल्या दीड वर्षेभरापासून चालू आहे. हे काम पूर्णत्वाच्या मार्गाकडे असून, आयोध्येच्या धर्तीवर २२ जानेवारीला श्रीराम मुर्तीची प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. २१ जानेवारीला सायंकाळी चार वाजता किल्लावेस येथून श्रीराम च्या मुर्तीची करमाळा शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. २२ जानेवारीला मुर्ती प्राणप्रतिष्ठापना झाल्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवात नागरीकांनी सहभागी व्हावे; तसेच ज्या भाविकांना मंदिराच्या जीर्णोध्दारासाठी मदत करायची आहे; अशा भाविकांनी तात्काळ मंदिर समितीच्या सदस्याकडे संपर्क साधून मदत करण्याचे आवाहन मंदिर समितीने केले आहे.

डिस्काउंटच्या जमान्यामध्ये भव्य डिस्काउंटसह
फ्रेश मटेरियलची हमी फक्त **एव्हरफ्रेश सुपरमार्ट** मध्येच !

भव्य डिस्काउंट ऑफर

मकरसंक्रांतीनिमित्त करमाळा शहरातील
किराणा मेगा सेल

● ऑफर कालावधी ●
१५ जानेवारी २०२४ पर्यंत

सर्व प्रकारच्या ब्रॅन्डेड वस्तु खरेदीवर कमीत कमी
10% पासून 51% पर्यंत एमआरपीवर डिस्काउंट

टीप : डिस्काउंट ऑफर, नियम व अटी समजावून घेण्यासाठी एव्हरफ्रेश सुपरमार्टला भेट द्या !

॥ नावाप्रमाणेच सर्व काही फ्रेश ॥
एव्हरफ्रेश सुपरमार्ट
॥ प्रिमियम क्वॉलिटी ॥ ॥ भरघोस डिस्काउंट ॥

*नियम व अटी लागू

किराणा । मसाले । प्रिमियम ड्रायफ्रुटस् । बिस्कीटस् । नमकीन ॲन्ड स्वीटस् । बेकरी ॲन्ड मिल्क प्रॉडक्टस् ।
। नॅचरल प्रॉडक्टस् । पर्सनल, होम ॲन्ड बेबी केअर । आयुर्वेदिक वस्तु । पुजेचे साहित्य

पंढरपूर अर्बन बँके समोर, दत्तपेठ, करमाळा. मो.7059293031

डॉ.राऊत Advanced dental Clinic & Root Canal Center
दातांचा दवाखाना

Smile with confidence

उपलब्ध सुविधा...
- इंटराओरल कॅमेराद्वारे तपासणी
- डिजीटल एक्स-रे
- अत्याधुनिक यंत्रणेद्वारे रूट कॅनल ट्रिटमेंट
- वेदनारहित दात व दाढ काढणे
- पडलेले दात बसविणे
- दात साफ करणे
- दाताच्या रंगाचे सिमेंट भरणे/चांदी भरणे

डॉ.कौस्तुभ काशिनाथ राऊत
बी.डी.एस.
(डेन्टल सर्जन)

उपलब्ध सुविधा...
- स्क्रुच्या सहाय्याने दात बसविणे (डेंटल इम्प्लांट)
- अक्कलदाढ काढणे
- वेडेवाकडे पुढे आलेले दात सरळ करणे
- अंशत: किंवा पूर्ण कवळी बसवणे
- हिरड्यांच्या रोगासाठी ट्रिटमेंट
- कॉस्मेटिक ट्रिटमेंट
- कर्करोगाचे निदान
- गरजेनुसार तज्ञ डॉक्टरांच्या भेटी

महात्मा गांधी शाळेच्या पाठीमागे, पुणे रोड, करमाळा. (मो.9552134186)

मकाईचे थकीत ऊस बिल २५ जानेवारी पर्यंत खात्यावर जमा होईल : जिल्हाधिकारी आशिर्वाद

करमाळा(सं.प्र.) : मकाई सहकारी साखर कारखान्याचे थकीत ऊस बिल २५ जानेवारी पर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होईल; असे मकाई कारखान्याचे चेअरमन, संचालक मंडळ यांनी आश्वासन दिले असल्याचे जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी सांगितले.

मकाईच्या थकीत ऊस बिल मिळण्यासाठी आयोजित केलेल्या प्रादेशिक सहसंचालक साखर संघ, शेतकरी, मकाई संचालक मंडळ पदाधिकारी बैठकीत ते बोलत होते. यावेळी प्रा.रामदास झोळ, शेतकरी कामगार पक्षाचे दशरथ कांबळे, ॲड.राहुल सावंत, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष रविंद्र गोडगे, शेतकरी प्रतिनिधी हरिदास मोरे, अंजनडोहचे माजी उपसरपंच शहाजी माने व शेतकरी बांधव तसेच मकाईचे माजी चेअरमन दिग्विजय बागल, विद्यमान चेअरमन दिनेश भांडवलकर, कार्यकारी संचालक हरिश्चंद्र खाटमोडे व सर्व संचालक मंडळ उपस्थित होते.

या बैठकीत प्रा.रामदास झोळ यांनी मकाई कारखान्याचे ऊस बील मागील वर्षापासून थकीत असून ते लवकरात लवकर शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावे; अशी मागणी केली. तसेच आम्ही वारंवार ऊस बिल मिळण्यासाठी धरणे आंदोलन, बोंबाबोंब आंदोलन याचबरोबर थु थु आंदोलनही केले. आपण याची गांभीर्याने दखल घेऊन ऊस बिल मिळण्यासाठी आम्हाला शब्द दिला आहे. शेतकऱ्यांकडून कर्तव्यदक्ष अधिकारी या नात्याने आपणाकडून आम्हांस आपण कारखाना चेअरमन, संचालक मंडळ यांना योग्य समज देऊन आमचे बिल मिळवून द्याल अशी अपेक्षा आहे. २५ जानेवारी पर्यंत आम्ही आपल्या शब्दाला मान देऊन थांबू. परंतु २५ जानेवारी पर्यंत शेतकऱ्याची ऊस बिल खात्यावर जमा न झाल्यास २६ जानेवारीला सामुहिक आत्मदहन आंदोलन करणार असल्याचे प्रा.झोळ यांनी सांगितले.

यावेळी मकाईचे माजी चेअरमन दिग्विजय बागल म्हणाले, की आम्ही मकाईचे ऊस बिल देण्यासाठी कटीबध्द असून, कोणत्याही परिस्थितीत त्वरीत शेतकऱ्यांना ऊस बिल मिळवून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यामुळे मकाई कारखान्याच्या भवितव्याच्या दृष्टीने व आमच्या गटाच्या दृष्टीकोनातून आम्ही शेतकऱ्यांची ऊस बिल लवकरात लवकर देऊ; असे त्यांनी सांगितले. याबाबत जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी प्रा.झोळ, दिग्विजय बागल, मकाई कारखान्याचे चेअरमन भांडवलकर, संचालक मंडळ, कार्यकारी संचालक, शेतकरी बांधव यांचेमध्ये सविस्तर चर्चा झाली. चर्चेनंतर जिल्हाधिकारी यांनी २५ जानेवारी पर्यंत आपण ऊस बिल मिळण्यासाठी थांबा. त्याअगोदर शेतकरी बांधवांना ऊस बिल मिळेल; असा शब्द दिला.

पोथरे येथील जनाबाई पांडूरंग झिंजाडे यांचे निधन

करमाळा(सं.प्र.) : पोथरे येथील जनाबाई पांडूरंग झिंजाडे (वय-८०) यांचे राहते घरी वृध्दपकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे चार मुली, नातवंडे असा परिवार आहे. पोथरे येथील ढेकळेवाडी येथे त्यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सर्व क्षेत्रातील नागरीक उपस्थित होते. सा.कमलाभवानी संदेश च्या संपादिका उषादेवी हिरडे यांच्या त्या आई होत्या.

प्रियंका आय केअर हॉस्पीटल
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600

उपलब्ध सुविधा... **डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र**
- मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
- जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
- फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर
- नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
- लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
- एस्कॅन बायोमेट्री आणि केरॉटोमॅट्री

डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन

अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)

सिध्दीविनायक ऑप्टीकल्स (आमच्याकडे शास्त्रोक्त पध्दतीने बनविलेले अचूक नंबरचे चष्मे अर्जंट बनवून मिळतील)
पत्ता : बँक ऑफ इंडिया समोर, करमाळा. मो.9527268181 / 9860872619

सुवर्णसंधी..! **सुवर्णसंधी..!**

गरीब असले म्हणून काय झाले, विचार तर मोठे असावेत

स्वतःचा विश्वास स्वतःवर ठेवून आपला स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची सुवर्णसंधी..!

नो वेटर नो कुक पती-पत्नी दोघे चालवू शकणार हॉटेल व्यवसाय म्हणूनच होणार दर दिवशी दोन हजाराच्या पुढे कमाई !

होय.., आम्ही सुगरणी व घोटी महिला गृहउद्योग समुहाने व्यवसाय करू पाहणाऱ्या ग्रामीण व शहरातील बेरोजगार विवाहित कुटूंबासाठी ११० किमी पर्यंत नाष्टा सेंटर, शाकाहारी-मांसाहारी मडक्यातील मेजवानी, लस्सी आंबील चावडी, लोणी डोसा, इडली चौक, भेळ पाणीपुरी गल्ली, बिर्याणी नाका, चटपटीत नाश्ता, तंदुरी चहा यार्ड. अशाप्रकारे आम्ही सुगरणीच्या शाखा देत असून व्यवसाय करणाऱ्या कुटूंबाचे जीवनमान उंचावण्याचा मानस बाळगत आहोत.

नवीन हॉटेल व्यावसायिकांना खालीलप्रकारे फ्रेंचायजी देण्यात येतील

आम्ही सुगरणी - महिला उद्योग, घोटी

• कलियुगात सुध्दा सतयुगातील उपहार मडक्यातील चुलीवरचे भोजन •

आम्ही सुगरणी नाश्ता फ्रेंचाईजी-१

१. दही धपाटे ठेचा -	६०/-	६. दही वडा -	४०/-	११. पावभाजी -	५०/-
२. सुगरण पराठा भरीत -	६०/-	७. दही शाबू वडा -	४०/-	१२. मिसळपाव -	६०/-
३. लच्छा पराठा कुर्मा -	६०/-	८. मावा वडा -	४०/-	१३. कडधान्य भेळ -	४०/-
४. सांजुरा पोळी-श्रीखंड -	६०/-	९. मसाला वडापाव -	२०/-	१४. मावा खीर -	४०/-
५. शाबु पराठा दही चटणी -	६०/-	१०. कोथिंबीर वड्या चटणी-	४०/-	१५. तंदुरी चहा बुस्ट -	२०-१०/-

• उद्योग समुहातील इतर मेनू पैकी दहा मेनू तुम्ही निवडू शकता. • नाश्त्यातील सर्व मेनू पार्सल सुविधासह फॅमिली पॅक मध्ये असतील.
• सर्व मेनू चुलीवरती कोळसा भट्टीवर बनवलेले राहणार आहेत. • सर्व धपाटे, पराठे, पाव, लोणी तुपासहीत असणार आहेत.

आम्ही सुगरणी व्हेज मडका मेजवानी फ्रेंचाईजी-२

१. मडका पनीर बटर मसाला -	१६०/-	१. मडका भरले वांगे मसाला -	१२०/-	१. मडका हिरवी खर्डा आमटी -	५०/-
२. मडका अक्का मसूर -	१२०/-	२. मडका खर्डा वांगे फ्राय -	१२०/-	२. मडका सुगरण स्पेशल आमटी -	६०/-
३. मडका शाही कुर्मा -	१६०/-	३. मडका खर्डा गवार मसाला -	१२०/-	३. मडका जीरा राईस -	१२०/-
४. मसाला शेवगा फ्राय -	१२०/-	४. मडका खर्डा कारले फ्राय -	१२०/-	४. मडका व्हेज अंडा मसाला -	१६०/-
५. मडका खरडा शेवगा फ्राय -	१२०/-	५. मडका पाठवड्या -	१२०/-	५. मडका कोफ्ता करी -	१६०/-
६. मडका वांग्याचे भरीत -	१२०/-	६. मडका पंचमेल दाळ फ्राय -	१२०/-	६. मडका कडधान्य उसळ -	८०/-

• उद्योग समुहातील इतर मेनू पैकी दहा मेनू तसेच नाश्ता अथवा नॉनव्हेज शाखा घेऊ शकता. सर्व मेनू मडका पॅक मध्ये असतील.
• सर्व मेनू मडक्यांमध्ये चुलीवर बॉईल केलेले असून तंदुरी स्पेशल आमटी, खरडा आमटी तंदुरीची असणार आहे.
• उद्योग समुहाकडून ज्वारी, बाजरी, नाचणी, मका व गहू पीठ उपलब्ध असणार आहे.

आम्ही सुगरणी मडका बिर्याणी नॉनव्हेज फ्रेंचाईजी-३

१. मडका चिकन बिर्याणी -	१६०/-	६. मडका मटन फ्राय -	२४०/-	११. मच्छि फ्राय -	१२०/-
२. मडका मटन बिर्याणी -	२६०/-	७. मटन खिमा घोटाळा -	२६०/-	१२. मडका अंडा मसाला -	८०/-
३. मडका अंडा बिर्याणी -	१००/-	८. पत्ता पुडा दम मटन -	३००/-	१३. म.मट. चि.खर्डा तंदुरी सुप -	५०/-
४. मडका चिकन खर्डा -	१६०/-	९. पत्ता पुडा दम चिकन -	२००/-	१४. म.मट.चि.काळा तंदुरी रसा -	६०/-
५. मडका चिकन फ्राय -	१६०/-	१०. पत्ता पुडा दम मच्छि -	२००/-	१५. म.मच्छि मुंडी तंदुरी रसा -	६०/-

• उद्योग समुहातील इतर मेनू पैकी दहा मेनू व शाकाहारी फ्रेंचायजी संलग्न करू शकता. • सर्व मेनू मडक्यामध्ये चुलीवर शिजवलेले असून काळा रसा व खर्डा सूप तंदुरीच असेल. • उद्योग समुहाकडून ज्वारी, बाजरी, नाचणी, मका व गहू पीठ उपलब्ध राहते.

युवकांना खालीलप्रमाणे रिक्षा स्टॉल(४ X ७ गाडा) फ्रेंचायजी देण्यात येतील

घोटी महिला गृहउद्योग समुहाचे उत्पादने

• गरीबांना परवडणारे, मध्यमवर्गाला आवडणारे, श्रीमंतांना पोषक असणारे •

अंबिल-लस्सी चावडी (रिक्षा स्टॉल) फ्रेंचाईजी-४

१. मलाई लस्सी -	२०/-	६. गोला लस्सी -	३०/-	१२. मावा कुल्फी-	१०/-	१७. सोल कडी -	३०/-
२. ड्रायफ्रुट लस्सी -	४०/-	७. टेस्टी मिस्टी -	३०/-	१३. आईसक्रीम -	२५/-	१८. मावा मस्तानी -	६०/-
३. गुलकंद लस्सी -	३०/-	९. फ्रुटी टेस्टी मिस्टी -	५०/-	१४. जवार आंबील -	१०/-	१९. बासुंदी -	४०/-
४. हापुस लस्सी -	३०/-	१०. सुगरण ताक -	१०/-	१५. नाचणी आंबिल -	१०/-		
५. कोप्रा लस्सी -	४०/-	११. केसरी दुध -	३०/-	१६. हुलग्याचे माटगे -	२०/-		

भेळ पाणीपुरी गल्ली फ्रेंचाईजी-५		लोणी डोसा इडली चौक फ्रेंचाईजी-६		मडका बिर्याणी नाका फ्रेंचाईजी-७	
१. गोड भेळ -	४०/-	१. लोणी डोसा -	५०/-	१. मडका मटण बिर्याणी -	२००/-
२. हरा भेळ -	४०/-	२. इडली चटणी -	३०/-	२. मडका चिकन बिर्याणी -	१००/-
३. पाणीपुरी -	२०/-	३. मेदूवडा चटणी -	३०/-	३. मडका चिकन खर्डा -	१००/-
४. रगडा पुरी -	२०/-	४. म्हैसूर भजी चटणी -	३०/-	४. मडका चिकन मसाला -	१००/-
५. शेव समोरा -	२०/-	५. अॅपे चटणी -	३०/-	५. मडका चिकन काळा रस्सा -	३०/-
६. रगडा कचोरी -	२०/-	६. मोमज -	४०/-	६. लच्चा परोटा, चपाती -	३०-१५/-

आम्ही सुगरणी नाष्टा वार्ड फ्रेंचाईजी - ८

आम्ही सुगरणी नाष्टा वार्ड शाखा-१		आम्ही सुगरणी नाष्टा वार्ड शाखा-२		आम्ही सुगरणी नाष्टा वार्ड शाखा-३	
१. दहिधपाटे ठेचा -	५०/-	१. दहिवडा -	३०/-	१. मिसळ पाव -	५०/-
२. सुगरण पराठा भरीत -	५०/-	२. दही शाबुवडा -	३०/-	२. पाव भाजी -	४०/-
३. लच्छा पराटा कुर्मा -	५०/-	३. मावा वडा -	३०/-	३. कच्ची दाबेली -	२०/-
४. सांजुरी पोळी-श्रीखंड -	५०/-	४. मावा खिर -	३०/-	४. वडा भाजी पाव -	३०/-
५. शाबु पराठा - दही -	५०/-	५. कोथंबिर वड्या चटणी -	३०/-	५. मसाला वडापाव -	१०/-

आम्ही सुगरणी तंदुरी चहा यार्ड फ्रेंचाईजी - ९

१. तंदुरी चहा २. तंदुरी नेस कॉफी ३. तंदुरी ब्लॅक टी
४. तंदुरी मसाला दुध ५. तंदुरी ब्लॅक टी

घोटी महिला गृह उद्योगाची इतर उत्पादने फ्रेंचाईजी - १०

सर्व प्रकारचे मसाले, बेकरी उत्पादने, नमकीन, स्नॅक्स पाऊच, वेफर्स, शेवई, नुडल्स, लोणचे, पापड, कुरडई, सांडगे इ. सर्व प्रकारच्या सालपापड्या असतील

ई-रिक्षा किंवा मोटारसायकल तसेच कोणत्याही तीनचाकी, चारचाकीने टोचन करता येणारे पॅक बॉडी ट्रॉली स्टॉल (४ X ७ गाडा) सुध्दा उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच उद्योग समुहातील प्रॉडक्ट सप्लायर्ससाठी माल वाहतुक टेम्पो महिन्याच्या करारवरती भाडेतत्वावर काही शर्तीनुसार स्वीकारले जातील

ऑफिस पत्ता : किल्ला खंदक रोड, करमाळा., जि.सोलापूर (मो.9226207583, 9689810855, 9689370855)

महादेव फंड यांचे कार्य समाजाला प्रेरणादायी : तानाजी जाधव

करमाळा(सं.प्र.) : सर्वसामान्य कुटूंबात जन्म घेऊन आपल्या कार्यकर्तृत्वाच्या जोरावर लोकनेता होणाऱ्या महादेव आण्णा फंड यांचे कार्य समाजाला प्रेरणादायी आहे; असे मत टायगर ग्रुपचे अध्यक्ष तानाजी जाधव यांनी व्यक्त केले.

महादेव आण्णा फंड मित्र मंडळाच्या वतीने महादेव फंड यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सत्कार समारंभ कार्यक्रमात श्री.जाधव बोलत होते. पुढे बोलताना श्री.जाधव म्हणाले, की प्रत्येक माणूस हा स्वत:च्या सुखासाठी धडपड करत आहे. अशा स्वार्थी दुनियेत आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो, या भावनेतून प्रत्येकाच्या सुख-दु:खामध्ये सहभागी होऊन त्यांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण करून त्यांना आधार देण्याचे महादेव फंड यांचे कार्य कौतुकास्पद आहे. त्यांच्या या कार्यास टायगर ग्रुपच्या वतीने सर्वतोपरी सहकार्य राहील; असे आश्वासन दिले.

महादेव आण्णा फंड यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार मित्र परिवाराच्या वतीने शाल, श्रीफळ देऊन व केक कापून करण्यात आला. यावेळी टायगर ग्रुपचे तानाजी जाधव, मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष नाना मोरे, व्यापारी राजुशेठ शियाळ, बाळासाहेब नरारे, संतोष जगताप, डॉ.महेश वीर, लष्मण लष्कर गुरूजी, ॲड.सुहास मोरे, पत्रकार दिनेश मडके, डी.जी.पाखरे, सुदर्शन पाटील, हर्षद वीर, दत्तात्रय कांबळे, सलीम तांबोळी, अजय निर्गुणकर, संतोष बादाडे, राजेंद्र हेगडे, डॉ.विजय गादीया, विश्वास काळे-पाटील, दिलीप चव्हाण, कुकडे टेलर, संतोष भोसले, नवनाथ क्षीरसागर, भोजराज फंड, इम्तियाज शेख, दिपक किरवे, बाबर गुरूजी, चक्रधर पाटील, कांबळे गुरूजी, चंद्रकांत फंड यांच्यासह मित्र मंडळाचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते. सुत्रसंचालन संतोष पोतदार यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ.महेश वीर यांनी मानले.

ह.भ.प.नवनाथ साहेबराव झिंजाडे यांचे अल्पशा आजाराने निधन

करमाळा(सं.प्र.) : पोथरे येथील ह.भ.प.नवनाथ साहेबराव झिंजाडे (दुकानदार, वय-४८) यांचे अल्पशा आजाराने १ जानेवारीला रात्री दौंड येथे निधन झाले. झिंजाडे यांचे पोथरे येथे किराणा दुकान होते. तसेच ते उत्तम गायक व किर्तनकार होते. पोथरे ते पंढरपूर येथे आषाढी वारीला दिंडी काढत होते व त्या दिंडीचे ते दिंडीचालक होते. गेल्या तीन महिन्यापूर्वीच त्यांचे लहान भाऊ बाबूराव झिंजाडे यांचे आकस्मात निधन झाले. त्यानंतर ते खचले होते. त्यानंतर आजारी पडले. करमाळा, नगर, श्रीगोंदा व दौंड येथे त्यांचेवर उपचार करण्यात आले. पण अखेर त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या मागे पत्नी, एक मुलगी, दोन पुतणे असा परिवार आहे.

श्री गजानन अगरबत्ती
- सुगंधी अगरबत्ती
- कापूर
- अत्तर
- धूप
- भीमसेन कापूर,
- विविध कलरची रांगोळी
- सर्व प्रकारचे लोबन,
- सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य योग्य दरात मिळेल !

पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)

JK Design Studio
आर्किटेक्ट इंजिनियर्स इंटेरियर
- आर्किटेक्चर ड्रॉईंग ॲन्ड डिझाईन (वास्तुशास्त्रनूसार)
- रेसिडेंशियल, कमर्शियल, इंडस्ट्रियल
- स्टील डिझाईन
- बिल्डिंग परवाना
- इंटेरियर डिझाईन
- बिल्डिंग कन्स्ट्रक्शन
- लॅन्डस्केप डिझाईन
- कन्सल्टन्सी

Architecture Interior construction

Er.Irshad M. Kazi (B.E.Civil) Mo.8421124858
Ar.Junaid M. Kazi (B.Arch) Mo.9975579996

पत्ता
२६९०/३३९ गणेशनगर, करमाळा.
jkdesignstudio23@gmail.com
Jk_design_studio23

खुशखबर मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको नगर-बारामती-सोलापूर खुशखबर
बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)
आता आपल्या करमाळ्यात !

उपलब्ध सुविधा...
- मुळव्याधवर इंजेक्शन
- डिलीव्हरीनंतर उद्‌भवारे कोंब
- एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्‌भवणारे कोंब
- संडासवाटे रक्त येणे, पु येणे
- संडासची जागा बाहेर पडणे
- संडास जागी खाज व आग होणे
- संडासाचा नागवेडा
- संडास नंतर बसण्यास त्रास होणे
- भगंदर, फिशर
- चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)

ओपीडी /ऑपरेशन ठिकाण
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
लोकरे हॉस्पिटल
कृष्णाजीनगर, बायपास रोड
करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)

परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई

विशेष सुचना...
१. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल.
२. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे.
३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील.
४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य.
५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.

नाव नोंदणीसाठी संपर्क
मो.9763035862

बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.

जेऊर येथे ९ जानेवारीला इतिहासकार श्रीमंत कोकाटे यांचे व्याख्यान

करमाळा(सं.प्र.) : जेऊर येथील भारत शिक्षण प्रसारक मंडळाच्या शैक्षणिक संकुलाचे वार्षिक स्नेहसंमेलन ९ जानेवारीला दुपारी दोन वाजता संपन्न होणार आहे. यानिमित्त प्रसिध्द इतिहासकार आणि वक्ते श्रीमंत कोकाटे यांचे व्याख्यान भारत शैक्षणिक संकुलाच्या भव्य मैदानावर आयोजित केले आहे. तरी या कार्यक्रमास इतिहास प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे; असे आवाहन सचिव प्रा.अर्जुन सरक यांनी केले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उद्योगपती नारायणशेठ आमृळे (झरे) हे राहणार असून माजी आमदार नारायण पाटील यांचे प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न होणार आहे. यावेळी दहावी, बारावी, विद्यापीठ आणि स्पर्धा परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा व तालुका, जिल्हा, विभागीय, राज्य आणि राष्ट्रीयस्तरावर वेगवेगळ्या क्रिडा प्रकारात निवड झालेल्या खेळाडूंचा सत्कार मान्यवरांचे हस्ते करण्यात येणार आहे. तसेच १० जानेवारीला दुपारी दोन वाजता विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम होणार आहे. यावेळी नागरीकांनी उपस्थित रहावे; असे आवाहन करण्यात आले.

६ जानेवारीला गुरूप्रसाद मंगल कार्यालयात सुर सुधा महोत्सव

करमाळा(सं.प्र.) : सुरताल संगीत विद्यालयाच्या वतीने ६ जानेवारीला सायंकाळी पाच वाजता गुरूप्रसाद मंगल कार्यालय दत्तपेठ येथे सुर सुधा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन आमदार संजयमामा शिंदे यांचे हस्ते होणार असून प्रमुख मान्यवर म्हणून विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे निवृत्त सहसंचालक दत्तात्रय देवळे आदी उपस्थित राहणार आहेत. तसेच या महोत्सवात विद्यालयाचे विद्यार्थी आपली विविध कला सादर करणार आहेत. तसेच संस्थेच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या तसेच आलेल्या कलाकारांचा विविध पुरस्कार देऊन सन्मान केला जाणार आहे. यामध्ये गटशिक्षणाधिकारी राजकुमार पाटील व नांदेड येथील पोलीस इन्स्पेक्टर नागनाथ आयलाने यांना बा.सं.नरारे महाराज जीवन गौरव पुरस्कार तर डॉ.कविता कांबळे यांना करमाळा संगीत रसिक पुरस्कार दिला जाणार आहे. तसेच कलाकारामध्ये सरबानी सेन (कोलकाता) व चित्रलेखा गोगोई (गुवाहटी), डॉ.विधी नागर (इंदौर), डॉ.मयुरा खटावकर(मुंबई) यांना करमाळा नृत्यभूषण अवॉर्ड तर स्नेहा रामचंद्र (हैद्राबाद), अर्पिता व्यंकटेश (कोलकाता) यांना नृत्य शिरोमणी अवॉर्ड तसेच काकली हजारिका (गुवाहटी), बनिता भांजा (भुवनेश्वर) यांना नृत्य सम्राज्ञी अवॉर्ड, दिपीका बोरे (गुवाहटी) यांना करमाळा नृत्य कला अवॉर्ड देऊन गौरविण्यात येणार आहे. तरी या कार्यक्रमास संगीत रसिकांनी उपस्थित रहावे; असे आवाहन सुरताल संगीत विद्यालयाचे बाळासाहेब नरारे यांनी केले आहे.

डॉ.नायकुडे यांचे डोळ्यांचा दवाखाना श्रीजय नेत्र रूग्णालय
डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे (नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)
B.A.M.S.,M.S.(Shalakya-Netra) (Gold Medalist) Reg no.1-77199-A
करमाळा शहरामध्ये मोतीबिंदू (Cataract), डोळ्यांवरील पडदा(Pterygium) तिरळेपणा (Squint) यासारख्या डोळ्यांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया अत्याधुनिक मशिनद्वारे(फेको लेझर) व तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत केल्या जातील.
वेळ : सोमवार ते शनिवार स.१०.३० ते सायं ७ (रविवार बंद) इमर्जन्सी सेवा उपलब्ध
श्रीजय ऑप्टिकल (सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.)
श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा. मो.९८३४०७१२१८, ९९२१०१३४९३

जय भवानी ।

जय शिवराय ॥

हे नूतन वर्ष सर्वांसाठी सुख-समृध्दी, ऐश्वर्य, धनसंपदा घेवून येवो आणि राजकीय नेत्यांनी मानवनिर्मित दुष्काळ तालुकावासियांना दाखवला तो परत कधीही न दिसो !

जनतेच्या हृदयातील खरे आमदार

लोकनियुक्त सरपंच

कुस्ती क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दल निमगाव केतकी (ता.इंदापूर) ग्रामस्थांच्या वतीने माजी आमदार **मा.श्री.नारायण (आबा) पाटील** यांना 'जीवनगौरव' पुरस्कार मिळाल्याबद्दल तसेच मिरजगाव येथे संपन्न झालेल्या खुल्या गटाच्या राज्यस्तरीय कर्मयोगी केसरी कुस्ती स्पर्धेत **पै.जयदीप राजन(आण्णा) पाटील** यांनी प्रथम क्रमांकाचे बक्षीस बुलेट व चांदीची गदा पटकाविल्याबद्दल...

हार्दिक अभिनंदन

पंचायत समितीचे माजी सभापती
डबल उपमहाराष्ट्र केसरी
शिवछत्रपती पुरस्कार विजेते
मा.पै.अतुल(भाऊ) पाटील
यांना वाढदिवसाच्या लाख.. लाख..

हार्दिक शुभेच्छा !



शुभेच्छुक

युवा लिनन क्लब ॲन्ड टेलर्स, जेऊर

सर्व ब्रॅन्ड लिनन मिळेल

नारायण (आबा) पाटील मित्र मंडळ, जेऊर

नागेश कुदळे, बापू मोटे, बाळासाहेब गायकवाड
बमा जाधव, मंगेश सुतार, जवाहर करे
नाना मोहिते, दिपक मांजरे, अतुल शेलार, समीर शेख

गुळाचा गोडवा येऊ दे जीवनाला,
तीळाची उब लाभू दे आपल्या नात्याला !

मकरसंक्रांतीच्या
हार्दिक शुभेच्छा

सोनी ज्वेलर्स

आकर्षक व शुध्द
चांदीचे जोडवे व भांडी मिळतील

916 हॉलमार्क सोने-चांदी व राशी खड्यांचे व्यापारी

आकर्षक व सुबक सोने-चांदीचे दागिणे
मिळण्याचे सुवर्णदालन !

- **रवि सोनी 9421029869**
- **अजित सोनी 9423336932**

● पत्ता : मेनरोड, करमाळा., जि.सोलापूर ●

॥ द्वितीय पुण्यस्मरण ॥

कालकथित रासु भिकाजी कांबळे
(माजी मुख्याध्यापक, श्री संगमेश्वर विद्यालय संगोबा)
(मृत्यू : दि.५/१/२०२२)

भाऊ.. तुमच्या आठवणी हसवतात
आणि तुमच्या आठवणी रडवतात
काहीच न बोलता आठवणी निघून जातात
तरी आयुष्यात शेवटी
भाऊ.. तुमच्या आठवणीच राहतात !

द्वितीय पुण्यस्मरणदिनी आपल्या स्मृतीस भावपूर्ण आदरांजली !

शोकाकूल

● कांबळे परिवार (रोशेवाडी/करमाळा) ● सवाई परिवार(बीड)
● लोंढे परिवार(पुणे) ● गायकवाड परिवार(परांडा) ● शिलेवंत परिवार(कऱ्हाड)
● निकाळजे परिवार(औरंगाबाद) ● बनसोडे परिवार(बीड)

कृष्णा हॉस्पिटल राशीनपेठ, करमाळा.(सर्व कर्मचारी)
कार्डिॲक, लॅप्रोस्कोपी, आय.यु.आय ॲन्ड मॅटर्निटी केअर सेंटर

राहूल स्मृती बचत गट
करमाळा, जि.सोलापूर

सुरताल संगीत विद्यालयाचे प्राचार्य
मा.श्री.बाळासाहेब नरारे यांना
दि.६ जानेवारी रोजी असलेल्या वाढदिवसास
तसेच
सुरताल संगीत विद्यालयाच्या
'२६ वे स्नेहसंमेलन' कार्यक्रमास व
'सुर-सुधा संगीत समारोह आणि सन्मान सोहळा'
कार्यक्रमास लाख.. लाख..

सुरताल संगीत विद्यालय, करमाळा.
सुरताल संगीत विद्यालय, करमाळा. १०

शुभेच्छुक

- यशकल्याणी परिवार, करमाळा.
- यशवंत परिवार, करमाळा.
- महादेव(आण्णा) मित्र मंडळ, करमाळा
- आर्ट ऑफ लिविंग परिवार, करमाळा
- पतंजली योग समिती, करमाळा
- शक्तीपुंज डान्स स्टुडिओ, मुंबई
- कथक साधना केंद्र, नवी मुंबई

राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभाग प्रदेशाध्यक्ष पदी पंडित कांबळे

करमाळा(सं.प्र.) : रावगाव येथील रहिवाशी व फुले-शाहू - आंबेडकर-साठे विचारांचे प्रवर्तक पंडित कांबळे यांची महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभागाच्या अध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे. या निवडीचे पत्र पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचे हस्ते कांबळे यांना प्रदान करण्यात आले. हा कार्यक्रम राष्ट्रवादी मुंबई प्रदेश कार्यालयात संपन्न झाला. यावेळी बोलताना जयंत पाटील म्हणाले, की कांबळे हे सामाजिक न्याय विभागात गेली २० वर्षापासून चांगले काम करत असून त्यांनी महाराष्ट्रात कार्यकर्त्यांची मोठी फळी निर्माण केली आहे. त्याचा पक्षाला नक्कीच फायदा होईल. कांबळे हे उच्चविद्याविभूषित असून राजकारणातील अष्टपैलू व्यक्तीमत्व आहे. यावेळी बोलताना पंडित कांबळे म्हणाले, की पक्षाने मला प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी दिल्याने माझी पहिल्यापेक्षा जास्त जबाबदारी वाढली आहे. भविष्यकाळात कार्यकर्त्यांच्या माध्यमातून पक्षाला बळकटी देण्यासाठी सामाजिक न्याय विभाग कटिबध्द आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व पदाधिकारी तसेच सामाजिक न्याय विभागाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या निवडीचे स्वागत रावगाव ग्रामस्थांनी केले आहे.

चिवटे बंधूच्या माध्यमातून तालुक्यात विकासाचे माहोल सुरू : अ‍ॅड.हिरडे

करमाळा (सं.प्र.) : राज्यामध्ये मुख्यमंत्री वैद्यकिय सहाय्यता कक्षाच्या माध्यमातून मंगेश चिवटे यांचे तर शिवसेनेच्या माध्यमातून करमाळा तालुक्यात महेश चिवटे या दोघा बंधूंच्या माध्यमातून विकासाचे माहोल सुरू आहे; असे मत ज्येष्ठ पत्रकार व संत साहित्याचे अभ्यासक डॉ.अ‍ॅड.बाबूराव हिरडे यांनी व्यक्त केले.

शिवसेनेच्या वतीने २२७ बांधकाम कामगारांना साहित्याचे वाटप अ‍ॅड.हिरडे यांचे हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष व जिल्हा नियोजन समितीचे सदस्य महेश चिवटे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष राजेंद्र बारकुंड, तालुका कृषी अधिकारी संजय वाकडे, सामाजिक कार्यकर्ते भरत वांगडे, पत्रकार अशोक नरसाळे, नाशीर कबीर, जयंत दळवी, विशाल परदेशी, नागेश शेंडगे तसेच विधानसभा अध्यक्ष राहुल कानगुडे, शिवसेना तालुका प्रमुख देवानंद बागल, जिल्हा समन्वयक निखिल चांदगुडे, उपतालुका प्रमुख दादासाहेब थोरात, शहरप्रमुख नागेश गुरव, शाखाप्रमुख आजिनाथ इरकर, निलेश चव्हाण यांचेसह शिवसेना महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुख ज्योतीताई शिंदे उपस्थित होत्या.

पुढे बोलताना अ‍ॅड.हिरडे म्हणाले, की राजकारणाच्या जाग्यावर राजकारण असावं, पण राजकारणातून समाजकारण कसं करावं व सर्वसामान्यांची सेवा कशी करावी, हे चिवटे बंधूकडून शिकण्यासारखे आहे. शासनाच्या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणं ही महत्वाची गरज आहे. दलालाची साखळी मोडून या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे फार गरजेचे आहे. हे काम आता अधिक गतिमान झाले आहे. यावेळी जिल्हा नियोजन समितीवर सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल महेश चिवटे यांचा सत्कार तालुका पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आला.

> शिवसेनेच्या माध्यमातून तालुक्यात दोन हजार बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यात आली असून, त्यांना प्रत्यक्षात लाभ दिला आहे. याशिवाय त्यांच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व घरकुल मिळवून देण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू आहेत. ज्या व्यक्तींना लाभ मिळाला आहे, त्या व्यक्तींनी इतरांना लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावा; आम्ही त्यांना सर्व प्रकारचे सहकार्य करण्यास तयार आहोत.
>
> **...महेश चिवटे (जिल्हाप्रमुख, शिवसेना)**

इथं सौंदर्य जन्म घेतं..
होलसेल साडी डेपो
मो.9172092187
प्रोप्रा : मुन्नाशेठ हासिजा
सुरतच्या होलसेल भावात साड्या मिळतील.
लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स भवानीपेठ, करमाळा.
अ‍ॅड.आशुतोष ल.हासिजा (मुंबई हायकोर्ट)
मो.7387832186
घरगुती विक्रीसाठी साड्या होलदरात मिळतील

आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर
रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
- सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरूस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.
मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२

अभिनंदन !
सदस्य, सो.जि.नि.समिती
सावंत गटाचे नेते
आशिर्वाद
मा.नगरसेवक
शुभेच्छा !!
मा.नगरसेवक
गटसचिव व माजी नगरसेवक
मा.श्री.विजय चांदगुडे (भाऊसाहेब)
यांना दि.९ जानेवारी रोजी असलेल्या वाढदिवसास
हार्दिक शुभेच्छा तसेच सोलापूर जिल्हा नियोजन
समितीच्या सदस्य पदी
अ‍ॅड.राहुल सुभाष सावंत यांची
निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक अमोल मुटके (सर) कुंभेज, ता.करमाळा.

तालुक्यातील विविध प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी जिल्हाधिकारी यांना निवेदन

करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुक्यातील विविध प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रा.रामदास झोळ यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी कामगार पक्षाचे दशरथ कांबळे, ॲड.राहुल सावंत, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष रविंद्र गोडगे, शहाजी माने यांनी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांना निवेदन दिले. या निवेदनाची दखल घेऊन अधिकारी, शेतकरी यांची बैठक जिल्हाधिकारी कार्यालय येथे संपन्न झाली.

या बैठकीमध्ये प्रा.झोळ यांनी सध्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभुमीवर ऐन उन्हाळा मध्ये पाणीटंचाईचा सामना करावा लागणार आहे. उजनीतील पाण्याच्या साठ्याला हात न लावता जिल्ह्यातील धरणातून दहा टीएमसी पाणी घेऊन नंतर पाणी कालवाद्वारे सोडण्याचे नियोजन करण्याची गरज असून तशा सूचना अधिकाऱ्यांना द्याव्यात तसेच करमाळा आगारातील नादुरूस्त बसेस दुरूस्त करण्यासाठी सोलापूर जिल्ह्याची तज्ञ लोकांची मेकॅनिक टीम करमाळ्याला पाठवावी; अशी सूचना केली. या सर्व मागण्यांची दखल घेऊन लवकरात लवकर हे प्रश्न सोडविले जातील; असे आश्वासन जिल्हाधिकारी यांनी दिले.

डी.जी.पाटील विद्यालयात बालिका दिन साजरा

करमाळा(सं.प्र.) : संगोबा रोड येथील डी.जी.पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात थोर महिला समाजसुधारक सावित्रीबाई फुले यांचा जन्मदिन बालिका दिन म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक शिवाजी गायकवाड हे होते तर प्रमुख पाहूणे म्हणून माजी नगरसेवक प्रविण जाधव, शाळेचे व्यवस्थापक किरण शेंदरकर उपस्थित होते. उपस्थित पाहूण्यांचे हस्ते प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरूवात करण्यात आली. यावेळी बोलताना प्रविण जाधव यांनी महिलांनी शिक्षण घेऊन सर्व क्षेत्रात आघाडीवर राहणे किती गरजेचे आहे; याविषयी मार्गदर्शन केले. बालिका दिनानिमित्त सावित्रीबाई फुले वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शिक्षिका राधिका होनकळसे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटच्या टप्प्यात बालिका दिनाच्या घोषणा देण्यात आल्या व प्रतिज्ञा घेण्यात आली. यानंतर पसायदान झाले. उपस्थितांचे आभार योगिता सोनके यांनी मानले.

महाराष्ट्रात प्रथमच...
गाडी,युपीएस इन्व्हर्टरसाठी नविन बॅटरी घेताय ?
बॅटरी बदलण्यापूर्वी तुमच्या जुन्या बॅटरीची तपासणी करा
आणि बॅटरी बदलण्याच्या त्रासापासून चिंतामूक्त व्हा...
आता जून्या बॅटरी चालतील नव्यासारख्या !
२ चाकी | ३ चाकी | ४ चाकी | ट्रक | ट्रॅक्टर | JCB | पोक्लेन | सोलर
एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सोलर इन्व्हर्टर बॅटरी सर्व्हिसेस
सुभद्रा पॉवर सोल्युशन्स
प्रोप्रा. श्री. स्वप्निल आदिनाथ आदलिंगे (ME Industrial Automation) ☎9172927337
श्री.आदिनाथ जयवंत आदलिंगे (मा.विस्तार अधिकारी, पंचायत समिती, करमाळा) ☎7588506719
शाखा नं.१ त्रिमुर्ती कुशन्स् शेजारी पुणे रोड,करमाळा / शाखा नं.२: मातोश्री कॉम्प्लेक्स, IDBI बँकेच्या पाठीमागे, श्रीदेवीचामाळ रोड, भवानी नाका, करमाळा.

उमरड जि.प.शाळेतील माजी विद्यार्थ्यांचा मेळावा संपन्न

करमाळा(सं.प्र.) : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उमरड येथे माजी विद्यार्थी मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या मेळाव्याची सुरूवात मेजर संदीप बदे, शालेय समितीचे अध्यक्ष संजय कोठावळे, मकाई कारखान्याचे संचालक बापूराव चोरमले प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक हनुमंत भिल यांच्या हस्ते क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. प्रास्ताविक अनिल यादव यांनी केले व शाळेची जडणघडण थोडक्यात सांगितली. माजी विद्यार्थी प्रा.नंदकिशोर वलटे, बापूराव चोरमले, श्रीकांत मारकड यांनी शाळेबद्दलच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. दुसऱ्या सत्रात सर्व माजी विद्यार्थ्यांना घेऊन संगीत खुर्चीचा मनोरंजक खेळ खेळला गेला. यात विजेत्यांचा सन्मान केला गेला. त्यानंतर सर्व माजी विद्यार्थ्यांना शाळे तर्फे अल्पोपहार देण्यात आला. मेळाव्याच्या उत्कृष्ट नियोजनाबद्दल माजी विद्यार्थी किशोर गोडगे यांनी शाळेसाठी रोख पाच हजार रूपयांची देणगी दिली. या कार्यक्रमास प्रमोद कुलकर्णी, मोहन चौधरी, लहू कोठावळे, जनार्दन मारकड, समाधान मारकड, विकास बदे, चांगदेव कोठावळे, समाधान वलटे, चांगदेव चौधरी, महेंद्र कोठावळे, मुकेश बदे, संतोष पडवळे इ. माजी विद्यार्थी हजर होते. सुत्रसंचालन अनिल यादव यांनी केले तर नियोजन भोसले , राऊत गुरूजी यांनी केले.

पुणे येथील सुप्रसिध्द पोटविकार तज्ञ
डॉ.अभिजीत लक्ष्मण नीळ
(M.S.FMAS) (Endoscopist - Laproscopist)
प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या रविवारी
करमाळ्यात उपलब्ध !
21 / 1 / 2024
नांवनोंदणी आवश्यक
एन्डोस्कोपी
माफक दरात उपलब्ध
(एन्डोस्कोपीसाठी उपाशीपोटी यावे)
पोटविकाराच्या रूग्णांना उपचारासाठी
आता परजिल्ह्यात जायची गरज नाही..,
आता पोटविकार तज्ञ करमाळ्यातच उपलब्ध !
पोटविकारांच्या सर्व समस्यांवर निदान व अल्पदरात उपचार
उपलब्ध सुविधा...
- अत्याधुनिक दुर्बिणीद्वारे निदान व शस्त्रक्रिया (General surgery) लॅप्रोस्कोपी व एन्डोस्कोपी
- कर्करोग (कॅन्सर) उपचार व शस्त्रक्रिया (Onco surgery)
- मूत्रविकार उपचार (Uro surgery)
- अपघात विभाग, सांधेबदल शस्त्रक्रिया (Ortho pedic surgery)
- मेंदू/मणका विकार उपचार शस्त्रक्रिया (Nuro surgery)
- स्त्रीरोग व प्रसुतितज्ञ विभाग (Gynaec surgery)
- मुळव्याध/भगंदर-फिशियर उपचार व शस्त्रक्रिया (Piles surgery)

पत्ता
शिवश्री क्लिनिक
सचिन मेडिकल समोर, B.M. कॉम्प्लेक्स, दत्तपेठ, करमाळा.(9860982072)
संपर्क...
मो.8291174004
मो.9860982072
मो.9096613132
■ स्पर्श हॉस्पिटल रहाटणी, पुणे.
■ स्पर्श हॉस्पिटल काळेवाडी, पुणे
■ अमृते/स्पर्श हॉस्पिटल चिंचवड(पुणे)

पहाटे महादेवाला पाणी घातल्याने
कारखान्याचे प्रश्न सुटतील का ?

देशात सर्वाधिक साखर कारखाने असलेला जिल्हा म्हणून सोलापूर जिल्ह्याची ओळख आहे. जिल्ह्यात जवळपास ४० साखर कारखाने आहेत. त्यापैकी करमाळा येथे चार आहेत. दोन सहकारी व दोन खाजगी. त्यांची परिस्थिती सर्व तालुका जवळून पाहत आहे. सभासदांचे मालकीचे पाच-दहा हजार शेअर्सचे पैसे भरून सभासदाच्या पदरात काय मिळते ? न ऊस वेळेवर जातो, त्याचे पैसे वेळेवर मिळत नाहीत. दिवाळी, पाडवा साखर नाही. ऊस जाण्यासाठी दारोदार भटकावे लागते; त्यात सभासदांचा काय दोष ? तालुक्यात पावसा-अभावी दुष्काळी परिस्थिती असून रिकामे होत असलेले उजनी धरण, तालुक्याच्या पूर्व भागात पाण्याचे हाल, जुन-जुलै पर्यंत पिण्याचे पाणीही मिळणे कठीण होईल. त्यामुळे ऊस लागवड होणेही कठीण आहे. ऊस व साखर कारखान्याची परिस्थिती पाहून शेतकरी केळी व इतर पिकाकडे वळला आहे. ऊसाची नवीन लागवड कमी झाल्याने आगामी हंगामही कठीण आहे. आदिनाथ कारखान्याने ऊस उत्पादकांचे पैसे, एफआरपी वेळेवर न देणे, काटा पेमेंट देतो म्हणून पैसे वेळेवर न देणे, ऊसतोड टोळींचे नियोजन पैशाअभावी न करणे, कर्मचारी पगार वेळेवर न देणे, ऊस वाहतूकदार पेमेंट अडकवणे, कारखान्यात वीज, पाणी व्यवस्था अपुरी इ. बऱ्याच कारणाने आर्थिक अडचणी व नियोजनाअभावी कारखान्याची अवस्था बिघडलेली आहे. कर्मचारी पगार वेळेवर करू शकत नाही तर विनाकारण गरज नसताना नोकरभरती करण्याचे कारण काय ? कारखान्यातील भंगार विकून पैशाची जुळवाजूळव करावी लागत आहे. सध्या कारखाना नुकसानीत चालू ठेवण्याऐवजी वेळीच बंद करणे योग्य राहील.

आदिनाथ कारखाना किती दिवस चालला ?, साखर किती क्विंटल तयार झाली ? साखर काय क्वालिटीची आहे ? गव्हाणीतील ऊस किती दिवस वाळत आहे, पगाराची व्यवस्था काय ? इ. गोष्टींचा विचार केला तर कारखाना जास्त नुकसानीत जात आहे. जबाबदार नेते मंडळीने त्यात लक्ष घालणे गरजेचे आहे. सर्वांनी एकत्र येऊन मार्ग निघेल. सभासदाने गटतट, हेवेदावे न पाहता योग्य सकारात्मक विचाराने एकत्र यावे व निवडणूक लावण्याच्या दृष्टीने पावले टाकावीत. नुसत्या पहाटेच्या अंधारात महादेवाला पाणी घातल्याने मार्ग निघेल; असे वाटत नाही !

...डॉ.वसंतराव पुंडे
(मा.संचालक, आदिनाथ कारखाना)

सा.संदेश वार्षिक
वर्गणी २०० रू.

संगीत क्षेत्रातील चमकता तारा 'प्राचार्य बी.बी.नरारे'

करमाळा शहर हे विविधांगांनी प्रसिध्द आहे. या शहराला सांस्कृतिक भुमी म्हणून ओळखले जाते. पूर्वी शहरातून वेगवेगळी नाटके, कलापथके सादर केली जात होती. अलिकडच्या काळात संगीत क्षेत्राची पाहिजे तेवढी वाढ झालेली दिसत नव्हती. जे काही कलावंत होते ते फक्त स्वत:पुरतेच कार्यरत होते. गेल्या २५ वर्षापूर्वी प्राचार्य बी.बी.नरारे सर हे करमाळा शहरात आले आणि त्यांनी सुरताल संगीत विद्यालयाचे छोटेसे रोपटे लावले आणि २५ वर्षात त्याचा मोठा वृक्ष झाला आहे.

या सुरताल संगीत विद्यालयातून शेकडो विद्यार्थी शास्त्रीय व उपशास्त्रीय, गायन–वादन यात परिपूर्ण झाले आहेत. हार्मोनियम, तबला याचे विद्यार्थ्यांना परिपूर्ण ज्ञान देऊन त्यांनी विद्यार्थी घडविले आहेत. केवळ संगीतावरच लक्ष न ठेवता ते सामाजिक कार्यात सहभागी असतात. कोविड कालावधीमध्ये त्यांनी कोविड सेंटर मध्ये जाऊन योगा व प्राणायामचे प्रशिक्षण दिले होते. श्री श्री रविशंकर यांचे आर्ट ऑफ लिव्हींगचे कोर्सही त्यांनी शहरात राबवून अनेकांना व्याधीमुक्त करण्याचे काम केले आहे. आपल्याकडे येणारा विद्यार्थी पैसे किती देतो की देत नाही; याचा त्यांनी कधीही विचार न करता, न रागवता सहजरितीने आपल्याकडे येणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांनी बहुमोल असे मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना तर घडविलेच पण सुरताल संगीत विद्यालयाचे नावही उज्वल केले. पूर्वी संगीताच्या परीक्षेसाठी करमाळा येथील विद्यार्थ्यांना बार्शी, मिरजगाव येथे जावे लागत असे. परंतु प्राचार्य नरारे यांनी अखिल भारतीय गांधर्व मंडळ मुंबई यांचेकडे प्रयत्न करून विशारद पर्यंतचे परीक्षा केंद्र करमाळा येथे सुरू केले आहे. सुरताल विद्यालयास राज्य शासनाच्या सांस्कृतिक संचालनालयाची मान्यता मिळाली आहे.

करमाळा शहरवासियांसाठी प्रतिवर्षी ते वेगवेगळे कार्यक्रम घेतात. त्यामध्ये पं.विष्णू दिगंबर पलुस्कर व के.एन.बोळंगे यांच्या पुण्यतिथी निमित्त संगीत रजनीचे कार्यक्रम तसेच विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन, दिवाळी पहाट, श्रावणसरी असे विविध कार्यक्रम ते घेत असतात. करमाळेकरांना वर्षभर संगीत मैफिलीचा कार्यक्रम अनुभवास मिळतो. गेल्यावर्षी सुरताल संगीत विद्यालयाच्या रौप्यमहोत्सवानिमित्त संगीत नृत्य महोत्सव व पुरस्कार वितरण सोहळा आयोजित केला होता. यावेळी विविध राज्यातील मान्यवर मंडळी उपस्थित होते. एवढेच नाहीतर प्राचार्य नरारे सर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मन की बात कार्यक्रमात मोदी यांचेबरोबर संवाद साधून करमाळेकरांचे नाव उज्वल केले आहे. अशा एका धडपड्या व प्रयत्नवादी शिक्षकास वाढदिवसाच्या निमित्ताने खूप खूप शुभेच्छा !

मेहेर नेत्र ॲन्ड दंत हॉस्पिटल
MEHER EYE & DENTAL HOSPITAL
बायपास रोड, शिंदे हॉस्पिटल शेजारी, करमाळा. मो.७८७५६१९६९६

डॉ.हितेश बाळासाहेब मेहेर
MBBS. MS OPHTHALMOLOGY

डॉ.नेहा हितेश मेहेर(देवकर)
BDS (DENTAL SURGEON)

डॉ.पुनम शैलेश मेहेर(गोरे)
BDS (DENTAL SURGEON)

- कॉम्प्युटरद्वारे नेत्र तपासणी
- मोतीबिंदू, काचबिंदू(फेको) स्पेशालिस्ट
- अद्ययावत ऑपरेशन थिएटर
- रूट कॅनाल ट्रीटमेंट,
- कवळी बसविणे, बालदंत समस्या
- हिरड्यांची शस्त्रक्रिया

अनंत ऑप्टीशियन्स
डॉ.आंबेडकर शॉपींग सेंटर, भाजी मंडई जवळ
करमाळा.(९४२३३३३९६०, ९९६०९७७३०६)
—सर्व प्रकारच्या नंबरचे चष्मे,
—गॉगल्स मिळतील. अत्याधुनिक
—मशिनद्वारे चष्मे फिटींग

ग्रामायण
भाग-६

सन १९८८ ला जेऊरला थांबणारी जनता एक्सप्रेसचे उद्यान एक्सप्रेस असे नामकरण करून सुपरफास्ट केली आणि जेऊरला असलेला थांबा काढून घेतला. पुणे येथे जाण्यासाठी दिवसभरात एकही एक्सप्रेस नाही. खूपच गैरसोय जाली. सर्व लोकांचे आग्रहाने आंदोलन करण्याचे ठरविले. त्यासाठी ग्रामसेवा संघाची स्थापना करून धर्मदाय आयुक्तांकडे नोंदणी केली. मी संघाचा संस्थापक/सचिव. संघाचे एकूण २०० सभासद होते. वार्षिक वर्गणी १०० रू. होती. मी आणि जेऊरचे सरपंच, काही नागरीक असे सोलापूरला डीआरएम यांना भेटून निवेदन देण्यासाठी गेलो. डीआरएम यांनी जीएम मध्य रेल्वे यांना प्रस्ताव पाठवितो; असे सांगितले. काही महिने गेले. काही हालचाल नाही. त्यावेळी असलेले आमदार रावसाहेब पाटील यांचेसह मुंबईत जनरल मॅनेजर यांची भेट घेतली. प्रस्ताव रेल्वे बोर्डाकडे पाठविल्याचे आश्वासन त्यांनी दिले. परंतु पुढे काहीच हालचाल नाही. आमचे आणि सोलापूर जिल्हा प्रवासी संघटनेचे शिष्टमंडळ पुन्हा डीआरएम यांना भेटण्यासाठी गेले. पण शिष्टमंडळास सुपरफास्ट आहे, थांबा मिळणे कठीण असे सांगण्यात आले. आता निर्वाणीचे अस्त्र. रेलरोको आंदोलनाचा इशारा दिला. तारीख कळवली. रेल्वे आणि राज्य पोलीसांनी आंदोलन करू नये म्हणून रोज रात्री जेऊर पोलीस ठाण्यावर चौकशीसाठी पाचारण केले. गंभीर परिणाम सांगितले. आंदोलनापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. शेवटी आंदोलनाचे दिवशी गावात १४४ कलम लावले. आम्ही दोन–दोनच्या गटाने ग्रामपंचायत सभागृहात जमा झालो. या सभागृहाचे मागील दार रेल्वे हद्दीत. आम्ही प्रवासी संघटनेचे हजारो बॅजेस केले. प्रत्येकास लावून रेल्वे प्लॅटफॉर्मवर पाठविले. सोलापूर जिल्हा प्रवासी संघटनेचे अध्यक्ष रोहिदास मोरे आणि आमदार रावसाहेब पाटीलसह संपूर्ण गाव, मुले, महिला सह रेल्वे रूळावर आणि उद्यान एक्सप्रेस आडविणार हे डीआरएम यांना कळविले. त्यांनी हे बेकायदेशीर असून असे करू नये असे सांगितले. आमदारांनी आणि आम्ही ा सनदशीर मार्गाने आंदोलनाचे अधिकार आहेत हे बजाविले. शेवटी पाच मिनिटे रेल्वे थांबवा, निवेदन घेण्यासाठी सक्षम अधिकारी पाठवितो मात्र हिंसक वळण नको हे सांगितले. आम्ही हजारोच्या संख्येने रूळावर होतो. उद्यान एक्सप्रेस आली व आडवली रेल्वे अधिकाऱ्यांनी निवेदन स्विकारले. शांततापूर्ण वातावरणात हे आंदोलन झाले. आमचे रेल रोको यशस्वी झाले. थांबा उद्यान एक्सप्रेस ऐवजी अत्यंत सोयीची हैद्राबाद एक्सप्रेसचा थांबा मिळाला.

...डॉ.सुभाष सुराणा, जेऊर. मो.८९७५५४९०६०

कामगार पाहिजेत
पुणे येथील सुप्रसिध्द **'साईबा अमृततुल्य'** फ्रेंचायजीसाठी
कामगार पाहिजेत. गरजूंनी संपर्क साधावा !
पत्ता
के-हाईटस् बिल्डींग, बायपास रोड, जोगेश्वरी मिसळ
जवळ, करमाळा. मो.8484028506, 8007138389

चार खोल्यासहीत वाडा विकणे आहे
करमाळा शहरातील वेताळपेठ येथील वेताळ मंदिर
शेजारील चार खोल्यासहीत वाडा विकणे आहे
संपर्क
संजीवनी सतीश शहाणे, मो.9890290508

हिंदूहृदयसम्राट
स्व.बाळासाहेब ठाकरे

आजोबा
कै.मच्छिंद्र रं.काळे

मुख्यमंत्री
मा.एकनाथ शिंदे

जिल्हा संपर्कप्रमुख
प्रा.शिवाजी सावंत

जिल्हाप्रमुख
मा.महेश चिवटे

वैद्यकिय सहा.कक्षप्रमुख
मा.मंगेश चिवटे

वडील
मा.ईश्वर काळे

राज्यात पहिला

उपशहरप्रमुख, शिवसेना

करमाळा शहर शिवसेनेचे उपशहरप्रमुख श्री.राजाभाऊ काळे यांचे पुतणे व महात्मा गांधी विद्यालयाचा विद्यार्थी **मा.श्री.अक्षय ईश्वर काळे** याची MPSC मधून सेल टॅक्स इन्स्पेक्टर (STI) राज्यात चौथा व सहाय्यक कक्ष अधिकारी, मंत्रालय(ASO) राज्यात पहिला आल्याबद्दल...

हार्दिक अभिनंदन

शुभेच्छुक

शिवसेना करमाळा शहर व तालुका

आशिर्वाद
कै.गोविंदबापू पाटील

आशिर्वाद
आनंदयोगी महाराज

लोकनियुक्त सरपंच

लोकनेते/माजी आमदार

डबल उपमहाराष्ट्र केसरी
करमाळा पंचायत समितीचे माजी सभापती
शिवछत्रपती पुरस्कार विजेते
मा.पै.अतुल(भाऊ) पाटील
आपणांस वाढदिवसाच्या...

हार्दिक शुभेच्छा...

७ जानेवारी

शुभेच्छुक

पै.अतुल(भाऊ) पाटील मित्र मंडळ, करमाळा तालुका